भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ८०४/माहिती कक्ष/वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा

दिनांक ०८/१२/२०१६

**१)अश्लील शब्दात शिवीगाळ करून व जिवाने मारण्याची धमकी देवुन महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०६/१२/२०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या मुला सोबत यातील आरोपीकडे उसनवार पैसे घेण्यासाठी गेली असता आरोपीने तिथे जमलेल्या लोकंसमोर तिला अश्लील शेरेबाजी व शिवीगाळ करून तिची लैगीक छळवणुक केली व फिर्यादीचा मुलगा भांडण सोडवीण्यास गेला असता आरोपीने त्याच्यावर देखील हमला करीत जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(अ)(३),३५२ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी तोडासे.मॅडम पोस्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) महीलेवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०६/१२/२०१६ रोजी २१०.०० वा. दर. यातील फिर्यादी पिडीत महीला ही आपले घरी छपरात झोपली असता यातील आरोपीला पिडीत ही अणुसुचीत जातीची आहे. असे माहीत असतांना सुध्दा तिचे घरी जावुन वहीनी उठा असे म्हणुन आरोपीने तिचा जबरदस्तीने हात पकडुन तिचेवर जबरी संभोग करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७६ ,५११,४५२ भादंवि. सहकलम ३(१)डब्ल(i)(ii)३(२)(V)ए. अजा.ज.अ. प्रती कायदा २०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधीकारी साकोली श्री संखे सा. हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) विदयुत शॉक लागुन इसमाचा मृत्यु:—**

दिनांक १३/०९/२०१६ चे १४.३० वा. दर. यातील आरोपी क्र. १ नी मृतक राजकुमार वामन रोकडे वय ५२ वर्ष रा. जेवनाळा हा आरोपी क्र.३ ला आपले शेतात विदयुत वायरींग काढण्यास नेले असता मृतक हा विदयुत पोल वरील वायर काढत असतांनी विदयुत शॉक लागुन मरण पावलयाने आरोपी क्र. १ व २ यांनी मृतक आरोपी क्र. ३ याचे घरी माहीती न देता संगनमत करून प्रेत मृत अवस्थेत गां.रू. पालांदुर येथे भरती केले. डॉ. मेमो वरून मर्ग क्र. १७/१७ कलम १७४ जाफौ.चे चौकशी अहवालावरून सरतर्फे फिर्यादी कोल्हे यांचे चौकशी अहवालावरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३०४,(अ), ३४ भादवी अन्वये दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी वाठीवे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**४) संगमत करून पैसाचे कारणावरून भांडण करून मारपीट करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक ०७/१२/२०१६ चे १६.३० वा.ते १६.४५ वा. दर. यातील फिर्यादी हितेश उर्फे राजा मोहणलाल इसरानी वय ३४ वर्ष रा. इंदीरा गांधीवार्ड भंडारा हा आपले चायपानचे दुकानात असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीच्या दुकानात जावुन खर्रा घेतला व पैसे न दिल्याने फिर्यादीने पैशाची मागणी केले असता कशाचे पैसे असे बोलुन भांडण करून विट व काठीने ,लाताबुक्यानी मारपीट करून फिर्यादीचे डोक्याला डाव्या खादयांवर मारून जखमी केले व सामानाची नुकशान करून जिवाने मारण्याची धमकी दिलयाने फिर्यादीचे तोडी रिपोर्ट व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,४२७,५०६,३४ भादवी अन्वये दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०७/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. तुमसर, पवनी ,लाखांदुर , व भंडारा येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४० लिटर हातभट्टी दारू + सडवा + साहीत्य कि. २,०५१०/—रू. व तसेच जुगारातुन कि. ८१०/—रू असा एकुण कि. २१,३२० / —रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९०४९००३३७२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.